**<u>ठळक बातम्या</u>**

**आकाशवाणी**

- आत्मनिर्भरतेचं उद्दिष्ट गाठण्याकरता सणासुदीला स्वदेशी वस्तूंची खरेदी करण्याचं प्रधानमंत्र्यांचं 'मन की बात'मधून आवाहन

- महाराष्ट्रात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती कायम, प्रत्यक्ष फिल्डवर राहून काम करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या अधिकार्यांना सूचना

- छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत तीन माओवादी ठार

- आयएसएसएफ कनिष्ठ गट जागतिक नेमबाजी स्पर्धेत मुलींच्या ५० मीटर रायफल थ्री पोझीशन प्रकारात अनुष्का ठोकूरनं पटकावलं सुवर्णपदक

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी भारत-पाकिस्तान लढत सुरु/ नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा भारताचा निर्णय

**<><><><><>**

आगामी सणासुदीचा काळ स्वदेशी गोष्टींचा वापर करून साजरा करण्याचा संकल्प करावा असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे सव्वीसाव्या भागात देशवासीयांशी संवाद साधला. आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वदेशीतूनच पुढे जातो असं ते म्हणाले. जीएसटी सुधारणांमुळे बचत उत्सव साजरा होत असताना "व्होकल फॉर लोकल" हा खरेदीचा मंत्र बनला पाहिजे, असं त्यांनी सांगितलं.

सण उत्सवांच्या निमित्तानं करण्याची स्वच्छता घरापुरती मर्यादित नसून संपूर्ण परिसराची स्वच्छता देखील आपल्या सगळ्यांचीच जबाबदारी असल्याचं त्यांनी सांगितलं.

आजच्या दिवशीच हुतात्मा भगतसिंग आणि महान गायिका लता मंगेशकर यांची जयंती असल्याचं स्मरण करून देत त्यांनी या दोघांनाही अभिवादन केलं, आणि त्यांच्या कार्याचा गौरव केला.

नवरात्रौत्सवाचं औचित्य साधून प्रधानमंत्र्यांनी देशाच्या महिला शक्तीच्या सामर्थ्याचा गौरव केला.

नौदलाच्या दीर्घ सागरी सफरीत सहभागी झालेल्या लेफ्टनंट कमांडर दिलना आणि लेफ्टनंट कमांडर रुपा यांच्याशी संवाद साधून, त्यांच्या आव्हानात्मक सफरीचे अनुभव ऐकण्याची संधी त्यांनी श्रोत्यांना दिली.

सण-उत्सवांनी भारताची संस्कृती जिवंत ठेवली आहे असं ते म्हणाले. या अनुषंगानंच आज जागतिक सण बनलेल्या छठ पूजेच्या महापर्वाचा युनेस्कोच्या सांस्कृतिक वारसा यादीत समावेश व्हावा यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं.

…**होल्ड - बाईट - प्रधानमंत्री MKB UNESCO - -**

येत्या २ ऑक्टोबरला महात्मा गांधी यांची जयंती साजरी करताना खादीचं कोणतंही उत्पादन खरेदी करून, अभिमानानं ते व्होकल फॉर लोकल या हॅशटॅगसोबत समाजमाध्यमांवर सामायिक करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

यंदाच्या विजयादशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्ष पूर्ण होत असल्याचा उल्लेख करुन त्यांनी संघाच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा गौरव केला.

लोकप्रिय आसामी गायक जुबीन गर्ग आणि प्रसिद्ध कन्नड साहित्यिक एस.एल. भैरप्पा यांचं स्मरण करत प्रधानमंत्र्यांनी त्यांना श्रद्धांजलीही वाहिली.

**<><><><><>**

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आजही मुसळधार पाऊस होत असून अनेक ठिकाणी पूरस्थिती कायम आहे.

**जालना** जिल्ह्यात भोकरदन, जाफराबाद, घनसावंगी तालुक्यात पुराचं पाणी शेतशिवारात शिरून पिकं पाण्याखाली गेली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज सकाळी मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांसह सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकार्यांशी संपर्क करुन पावसाच्या, मदतकार्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. पावसामुळे धरणांमधून विसर्ग वाढवण्याआधीच नदीकाठच्या ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी हलवण्याकडे लक्ष द्यावं, आणि सर्व अधिकार्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर राहून काम करावं, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

येत्या २ दिवसात राज्यात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून कोकण आणि मध्यमहाराष्ट्रात आजकरता जोरदार पावसाचा रेड अलर्ट, तर उद्याकरता ऑरेंज अलर्ट, हवामान विभागानं दिला आहे. मराठवाडा आणि विदर्भातही बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कररचनेतल्या सुधारणा २२ तारखेपासून लागू झाल्या आहेत. त्यात बालसंगोपनासाठीच्या वस्तूंबाबत केलेल्या कर सुधारणांविषयी आज जाणून घेऊया...

**व्हॉईस कास्ट (३५ सेकंद)**

*(बालसंगोपनासाठी लागणाऱ्या विविध वस्तुंवरचा जीएसटी कमी करून केंद्र सरकारने सामान्य माणसावरचा आर्थिक भार कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. बाळांसाठी लागणाऱ्या दुधाच्या बाटल्या, डायपर्स अशा आवश्यक वस्तुंवरचा कर १२ टक्क्यांवरून ५ टक्के केला आहे. त्यासोबतच बालआरोग्य आणि स्वच्छतेला प्रोत्साहन देण्यासाठी उच्च तापमानावरचं दूध पूर्णपणे करमुक्त केलं आहे. तापमापकावरचाही जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्के केला आहे.*

*बाळांसाठीच्या आवश्यक वस्तू परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणं हा यामागचा उद्देश आहे.)*

<><><><>

छत्तीसगडमध्ये कांकेर जिल्ह्यात तिरियारपाणीच्या जंगलात आज सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत तीन माओवादी ठार झाले. त्यांच्यावर एकूण १४ लाख रुपयांचं बक्षीस होतं. घटनास्थळावरून बंदुका आणि इतर साहित्य जप्त करण्यात आलं आहे. ठार झालेल्या माओवाद्यांमध्ये श्रवण मडकम उर्फ विश्वनाथ याचा समावेश असून त्याच्यावर ८ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

<><><><>

अकरा वर्षांआधी जम्मू काश्मीरमधली फुटीरतावादी चळवळ, नक्षलवादी चळवळ आणि ईशान्य भारतातील फुटीरतावादी चळवळ हे तीन अंतर्गत धोके सर्वात मोठे होते. मात्र रालोआ सरकार स्थापन झाल्यानंतर तिन्ही ठिकाणच्या फुटीरतावादी चळवळी मोडून पडल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं श्यामाप्रसाद मुखर्जी भारत मंथन २०२५ या कार्यक्रमात बोलत होते. आज ईशान्य भारतात मोठं परिवर्तन झालं असून हा भाग भारताच्या मुख्य भूमीच्या अधिक जवळ आला आहे, नक्षलवादी चळवळ पुढच्या वर्षीपर्यंत संपुष्टात येईल असं शहा म्हणाले.

<><><><>

आयएसएसएफ कनिष्ठ गट जागतिक नेमबाजी स्पर्धेत भारताच्या अनुष्का ठोकूरने आज मुलींच्या ५० मीटर रायफल थ्री पोझीशन प्रकारात सुवर्णपदक मिळवलं. नवी दिल्लीत सुरु असलेल्या या स्पर्धेतलं हे तिचं दुसरं सुवर्णपदक आहे. मुलांच्या स्पर्धेत एड्रियन कर्माकारला रौप्य पदक मिळालं. स्पर्धेत आतापर्यंत ४ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कांस्य पदकं मिळवून भारत  पदकतालिकेत अग्रस्थानी आहे.

<><><><>

आशिया क्रिकेट चषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज दुबईत भारत आणि पाकिस्तान यांच्यात अंतिम लढत सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

या स्पर्धेच्या ४१ वर्षांच्या इतिहासात प्रथमच भारत आणि पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना होत आहे. आतापर्यंत या दोन संघांमधे टी-ट्वेंटी चे १५ सामने झाले असून त्यात १२ वेळा भारतीय संघ विजयी ठरला आहे.

**<><><><><>**

सेवा पर्व या मालिकेत आज आपण प्रधानमंत्री पीएम किसान सन्मान निधी योजनेविषयी जाणून घेणार आहोत....

**व्हीसी**

*(देशाचा अन्नदाता असणाऱ्या शेतकऱ्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. याचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने २०१८ ला प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची घोषणा केली. याची सुरवात २४ फेब्रुवारी २०१९ पासून झाली. तेव्हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले होते....*

***होल्ड बाईट मोदी***

*प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना देशातल्या सर्वात मोठ्या कल्याणकारी योजनांपैकी एक आहे. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना दर चार महिन्यांनी दोन हजार रुपये दिले जातात. ही रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात वर्ग केली जाते. असे वर्षभरात सहा हजार रुपये शेतकऱ्याच्या खात्यात जमा होतात. या योजने अंतर्गत आतापर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यामधे तीन लाख ९० हजार कोटी रुपये जमा झाले असून शेतकऱ्यांच्या जगण्यात सकारात्मक बदल झाला आहे. )*

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणूक आणि आठ राज्यातल्या पोटनिवडणुकांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं निरीक्षकांच्या नेमणुका केल्या आहेत. यात सर्वसाधारण, पोलीस आणि विनियोजन निरीक्षकांचा समावेश आहे.

एकूण ४७० अधिकारी निवडणूक प्रक्रीयेसाठी नेमले असून त्यात ३२० आयएएस तर ६० आयपीएस अधिकारी आहेत.

बिहार विधानसभेबरोबरच जम्मू काश्मीर, राजस्थान, झारखंड, तेलंगण, पंजाब, आणि ओदिशात पोटनिवडणुका होणार आहेत.

**<><><><><>**

तामिळनाडूत करूर झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी तामिळनाडू सरकारने उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश अरुणा जगदीशन यांच्या चौकशी आयोगाची स्थापना केली आहे. अभिनेता आणि तमिळगा वेत्री कळघम या पक्षाचे संस्थापक विजय यांच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या एका रॅलीदरम्यान काल झालेल्या दुर्घटनेत ४० जण मृत्युमुखी पडले असून ८० जणांवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत..

**<><><><><>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी मिथून मन्हास यांची निवड झाली आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक भास्कर चंदनशिव यांचं लातूर इथं निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. चंदनशिव यांच्या पार्थिव देहावर आज संध्याकाळी कळंब या त्यांच्या मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले.

**//<><><><><>//**